# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO


## गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०१५

## अधिसूचना

क्रमांक : २१/२०१५ दिनांक : ५/३/२०१५

**विषय : वार्षिकांक स्पर्धा २०१३-१४ पारितोषिकांची घोषणा**

सर्व संबंधितांना माहितीकरिता कळविण्यात येते की, २०१३-१४ या सत्राकरिता आयोजित केलेल्या वार्षिकांक स्पर्धेत खाली नमूद केलेले वार्षिकांक पारितोषिक विजेते म्हणून घोषित करण्यात येत आहे.

| क्रमांक | | महाविद्यालयाचे नांव | | वार्षिकांकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| **अ) बिगर व्यावसायिक गट** | | | | |
| प्रथम क्रमांक रू. १००००/- | - | विद्याभारती महाविद्यालय, अमरावती | - | प्रतिभा |
| द्वितीय क्रमांक रू. ५०००/- | - | भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा | - | सुगंध |
| तृतीय क्रमांक रू. ३०००/- | - | महिला महाविद्यालय, अमरावती | - | समिधा |
| **ब) व्यावसायिक गट** | | | | |
| प्रथम क्रमांक रु.१००००/- | - | प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲंड मॅनेजमेंट, बडोरा | - | Techno-Stream 2014 |
| व्दितीय क्रमांक रु.५०००/- | - | सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲंड टेक्नॉलॉजी, अमरावती | - | INNOVATOR 2014 |
| तृतीय क्रमांक रु.३०००/ | - | बाबासाहेब नाईक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुसद | - | IMPETUS-2014 |

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

क्रमांक : २२/२०१५ दिनांक : ५/३/२०१५

**विषय : तलवारबाजी (पुरूष व महिला) या खेळ प्रकाराचा अंतर्भाव करण्याबाबत..**

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, तलवारबाजी (पुरूष व महिला) हा खेळप्रकार शैक्षणिक सत्र २०१५-२०१६ पासून नव्याने सुरू करण्याच्या दृष्टीने शारीरिक शिक्षण व रंजन मंडळाने दिनांक ०५.०७.२०१४ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र. १२६ अन्वये शिफारस केली असता सदर शिफारसीच्या अनुषंगाने वित्त व लेखा समितीने दिनांक ०२.०२.२०१५ च्या सभेत विषय क्र.६ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव शिफारस करण्यात आली. त्यानूसार व्यवस्थापन परिषदेने दिनांक १२.०२.२०१५ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र. 51 (D) अन्वये शैक्षणिक सत्र २०१५-२०१६ पासून आंतर विद्यापीठ तसेच आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत तलवारबाजी (पुरूष व महिला) या स्पर्धेचा अंतर्भाव करण्यास मान्यता प्रदान केली असून त्यानूसार –

१. तलवारबाजी (पुरूष व महिला) या चमु अंतर्गत विद्यापीठाच्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना नियम क्र.२/२००४ चे तरतुदीनुसार खेळाडू पोषाख, ट्रॅकसुट, कलरकोट, मोनो, खेळ साहित्य, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व प्रमाणपत्र तसेच अधिसूचना क्र.६९/२०१२ दिनांक १४.०६.२०१२ अन्वये विद्यापीठ राजपत्र भाग-२ च्या पृष्ठ क्र.१२८ वर निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार अमरावती शहरातील व अमरावती शहराबाहेरील निवड झालेल्या खेळाडूंना प्रशिक्षण कालावधीत प्रतिदिन प्रति खेळाडू अनुक्रमे रूपये १००/- व रूपये १५०/- इतका अल्पोपहार भत्ता (Refreshment Allowance) प्रदान करण्यात येईल.

२. आंतर महाविद्यालयीन तलवारबाजी (पुरूष व महिला) क्रीडा स्पर्धेचे आयोजनाकरिता विद्यापीठाच्या क्रीडा व सांस्कृतिक क्रीडा हस्तपुस्तिका नियम क्र. २/२००४ मध्ये अंतर्भूत असलेल्या दरात **विद्यापीठ राजपत्र भाग-२** मध्ये दिनांक ०९ एप्रिल, २००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या **अधिसूचना क्र. ५०/२००९ दिनांक ०३.४.२००९** च्या परिशिष्ट अ,ब मध्ये नमूद केलेले वाढीव दर तसेच वेळोवेळी अधिसूचित करण्यात येणारे वाढीव दर अनुज्ञेय राहतील.

३. आंतर महाविद्यालयीन तलवारबाजी (पुरूष व महिला) क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे (पुरूष व महिला यांचे स्वतंत्ररित्या) प्रति खेळाडू रूपये २००/- इतके प्रवेश शुल्क हे विद्यापीठ राजपत्र भाग-२ मधील पृष्ठ क्र. ३९ वर प्रकाशित करण्यात आलेल्या अधिसूचना क्र. २४/२०१२ दिनांक २३.२.२०१२ मध्ये निर्धारित करण्यात आल्यानुसार विहित कालावधीत सर्वसंबंधीत महाविद्यालयांनी विद्यापीठात धनादेश, धनाकर्ष अथवा रोखीने प्रवेश अर्जासह जमा करणे अनिवार्य राहील.

४. तलवारबाजी (पुरूष व महिला) या खेळप्रकारात भारतीय विश्वविद्यालयाचे नियमानुसार स्पर्धेकरिता निर्धारित केलेल्या वजन गट निहाय पुरूष व महिला खेळाडूस आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी करावे लागतील. तसेच या खेळाचा समावेश आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत करणे अनिवार्य ठरत असल्याने हस्तपुस्तिकेतील नियमानुसार आंतरगृह खेळ (Indoor Games) या अंतर्गत देय ठरत असलेल्या खर्चानुसार आयोजन खर्च संबंधित आयोजक महाविद्यालयास प्रदान करण्यात येईल आणि नियुक्त करण्यात येणाऱ्या पंच/परिक्षक व अधिकारी यांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मानधन प्रदान करण्यात येईल.

| अ.क्र. | नियुक्त करावयाचे पंच/परिक्षक व अधिकारी | संख्या | प्रदान करावयाच्या मानधनाचे दर |
|---|---|---|---|
| १. | Referee | ०१ | रूपये २००.०० प्रतिव्यक्ती प्रतिदिन |
| २. | Side Referee | ०२ | रूपये २००.०० प्रतिव्यक्ती प्रतिदिन |
| ३. | Score Keeper | ०१ | रूपये २००.०० प्रतिव्यक्ती प्रतिदिन |
| ४. | Time Keeper | ०१ | रूपये २००.०० प्रतिव्यक्ती प्रतिदिन |

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

# अधिसूचना

क्रमांक : २३/२०१५ दिनांक : ५/३/२०१५

**विषय :- नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालय सुरु करण्यास शासन पत्रात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल रोजी दि.२६.९.२०१४ व तहकुब सभा दि.२९.०९.२०१४ च्या विद्वत परीषदेने विषय क्र.४६ अन्वये मान्य केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी म.वि.कायदा १९९४ मधील कलम ८१ मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन Apex Body चे मान्यतेचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, म.वि.कायदा १९९४ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच,शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे व तसे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ८१ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

## TABLE

| Sr. No. | Name of the Society | Name of the New College | Subject(s) / Course (s)/ Faculty (ies) / Add. Section(s) | Intake Capacity | Period of affiliation | Govt. Sanction Letter No. & Date |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. |
| 1. | Apang Jeevan Vikas Sanstha, Bhumiputra Colony, Near Congress Nagar, Amravati. | B.Ed. College For Special Education, (HI), Opp. Dental College, Wadali Camp, Amravati. | B.Ed. (विशेष शिक्षण-कर्णबधिर) | 25 | for the Session 2014-15 | क्र.बी.एड.४६१३/ प्र.क्र.१६४/१३/मवि-२, दि.२८.०२.२०१४ |

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****